# स्वच्छ भारत मिशन (ग्रा) जिल्हा परिषद, अमरावती.

कॅम्प रोड, अमरावती. ४४४ ६०२

**श्रीराम कुलकर्णी**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प. अमरावती.

sbmzpamt1@gmail.com

Ph. No. 0721 2952552


जा.क्र./जिप/स्वभामि./समग्रा/ ७४४ /२०२३

एक कदम स्वच्छता की ओर

## घनकचरा व्यवस्थापन मार्गदर्शक सुचना

दिनांक :२५/८/२०२३

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, ---------------------------------------- (सर्व).

विषय — स्वच्छ भारत मिशन ग्रा. टप्पा-२ अंर्तगत गाव स्तरावरील घनकचरा व्यवस्थापन या घटकासाठी सर्व स्तरावरील घनकचरा व्यवस्थापन या घटकासाठी सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना.

संदर्भ — मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे पत्र क्र.स्वभामि-२०२३/प्र.क्र.६९/पापु-०८/दिनांक-२३/०८/२०२३.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, स्वच्छ भारत मिशन ग्रा. टप्पा-२ अंर्तगत घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांची योग्य पद्धतीने होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर बाब लक्षात घेता, जिल्हयात सुरू असलेल्या घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी व्हावी, यासाठी घनकचरा व्यवस्थापन नियमावली तयार करुन ग्रामपंचायतीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

सबब, तालुक्यात घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांत सुसूत्रता राहण्यासाठी व कामे गुणवत्तापुर्ण होण्यासाठी, आणि तालुक्यात सुरू असणा-या घनकचरा व्यवस्थापन घटका अंर्तगत येणा-या कचरा वर्गीकरण शेड, कचरा गोळा करण्याच्या पद्धती, नाडेप/कंपोस्ट पीट बांधकामाची गुणवत्ता, कचरा वाहतुक व अंतिम व्यवस्थापनाचे नियोजन, स्वच्छता कामांमध्ये महिला बचत गटांचा समावेश न करणे त्यांना प्रशिक्षण देणे, प्लास्टीक कचरा नियोजनाचा अभाव इत्यादी तसेच सांडपाणी व्यवस्थापन घटक अंर्तगत मोठया लोकसंख्या असणा-या गावांमध्ये नाविन्यपुर्ण तंत्रज्ञानाचा अभाव इत्यादी बाबत तालुक्यांमध्ये घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होणकरिता शासन स्तरावरुन घनकचरा व्यवस्थापन नियमावली ग्रामपंचायतीपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

करिता प्रत्येक ग्रामपंचायतींना योग्य मार्गदर्शन मिळणेकरिता घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात येत आहे. तरि घनकचरा व्यवस्थापन बाबत खालील सर्व सुचना ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व सरपंच यांचेपर्यंत पोहचविण्यात याव्या.

सहपत्र- घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना.

Bkulkarni 25/8/2023

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पावस्व)
जिल्हा परिषद, अमरावती

प्रत- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, जि.प. अमरावती यांना माहितीस सविनय सादर.

Bkulkarni

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पावस्व)
जिल्हा परिषद, अमरावती

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
७ वा मजला, गो.ते. रुग्णालय इमारत संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१
संकेतस्थळ www.mahawssd.gov.in Email: wssd-ws०८@mah.gov.in

**क्र. स्वभामि-२०२३/प्र.क्र.६९/पापु-०८** **दिनांक: २३ /०८/२०२३.**

**प्रति,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, सर्व.**

**विषय:-** स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत गाव स्तरावरील घनकचरा व्यवस्थापन या घटकासाठी सर्व साधारण मार्गदर्शक सूचना.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत, घनकचरा व्यवस्थापनाबाबत वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने राज्यात घनकचरा व्यवस्थापनाची कामे मोठया प्रमाणात सुरु आहेत. तथापि, सदर कामांचा दर्जा व अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर बाब लक्षात घेता, राज्यात सुरु असलेल्या घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांची योग्य पध्दतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी, घनकचरा व्यवस्थापन नियमावली तयार करुन ग्रामपंचायतीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. सबब, राज्यात स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांत सुसूत्रता राहण्यासाठी व कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी, जिल्ह्यांना मार्गदर्शन व्हावे याकरीता सोबत जोडलेल्या जोडपत्रान्वये घनकचरा व्यवस्थापन

अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत. तरी सर्व जिल्हा परिषदांनी घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांची अंमलबजावणी सदर मार्गदर्शक सूचनांनुसार करण्याची दक्षता घ्यावी, ही विनंती.

आपली,

(स्मिता राणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**सहपत्रः- मार्गदर्शक सूचना.**

प्रत:-

१. अतिरिक्त अभियान संचालक ( स्वच्छ भारत अभियान), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
२. जिल्हा समन्वयक ( स्वच्छ भारत अभियान) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पा.व स्व.), जिल्हा परिषद, सर्व.
३. संग्रहार्थ (पापु-०८)

# घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

## अनुक्रमाणिका


| अ.क्र. | शिर्षक | पृ.क्र |
|---|---|---|
| १. | पार्श्वभूमी | ०२ |
| १.१ | Flow Chart/Segregation Photo | |
| २. | निधी अनुज्ञेयता | ०३ |
| ३. | घनकचरा व्यवस्थापन | ०३ |
| ३.१ | घनकचरा व्यवस्थापन प्रणाली | ०४ ते १० |
| ४. | कचरा वर्गीकरण व अंतिम व्यवस्थापन | १० |
| ५. | सामाजिक सहभाग आणि क्षमता बांधणी | ११ |
| ६. | ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणे | ११ |

## घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

### १. पार्श्वभूमी-

ग्रामीण भागातील जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-२ ही केंद्र शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजनेमध्ये प्रामुख्याने, वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम, सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम, घनकच-याचे व्यवस्थापन, सांडपाण्याचे व्यवस्थापन, मैला गाळ व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, गोबरधन प्रकल्प या उपांगांची अंमलबजावणी करुन गावे हागणीदारी मुक्त अधिक करावयाची आहेत.

राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी यांचा स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत समाविष्ठ सर्व कामांचा आढावा, मा. सहसचिव, जलशक्ती मंत्रालय व मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षेतेखाली दि. १६ जून, २०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात आला होता. तसेच, मा सहसचिव, जलशक्ती मंत्रालय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी दि. १६ जून, २०२३ रोजी सकाळी ११ वाजता विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत बैठक घेतली होती. सदर आढावा बैठकांमध्ये मा. सहसचिव जलशक्ती मंत्रालय यांनी राज्यातील स्वच्छ भारत मिशनच्या कामाबाबत व राज्याच्या प्रगतीबाबत नाराजी व्यक्त केली आहे. सदरवेळी, राज्यात सुरू असणा-या घनकचरा व्यवस्थापन घटका अंतर्गत येणा-या कचरा वर्गीकरण शेड, कचरा गोळा करण्याच्या पद्धती, नाडेप / कंपोस्ट पीट बांधकामाची गुणवत्ता, कचरा वाहतूक व अंतिम व्यवस्थापनचे नियोजन, स्वच्छता कामांमध्ये महिला बचत गटांचा समावेश न करणे त्यांना प्रशिक्षण देणे, प्लास्टिक कचरा नियोजनाचा अभाव इत्यादी तसेच सांडपाणी व्यवस्थापन घटक अंतर्गत मोठ्या लोकसंख्या असणा-या गावांमध्ये नावीन्यपुर्ण तंत्रज्ञानाचा अभाव इत्यादी बाबत मा. सहसचिव जलशक्ती मंत्रालय यांनी तीव्र आक्षेप नोंदविले आहेत.

त्या अनुषंगाने, राज्यात सुरु असणा-या घनकचरा व्यवस्थापनाच्या कामांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी शासन स्तरावरुन घनकचरा व्यवस्थापन नियमावली तयार करुन ती ग्रामपंचायतीपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. त्याकरिता, राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून सद्यस्थितीतील कामे, शासन निकष, मा. सहसचिव जलशक्ती मंत्रालय यांच्या सूचना इत्यादी बाबी विचारात घेवून ~~खालील~~ पुढील प्रमाणे “घनकचरा व्यवस्थापन सर्व साधारण मार्गदर्शमक सूचना ” तयार करण्यात आलेली आहे.

## २. निधी अनुज्ञेयता

केंद्र शासनाने, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन उपांगांच्या अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे निधीची तरतूद केलेली आहे.

अ) **सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन** -

| सन २०२१ नुसार लोकसंख्या | स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत, निधी अनुज्ञेता (७०% स्वभामि व ३०% १५ वा वित्त आयोग या प्रमाणात) | |
|---|---|---|
| | घनकच-याचे व्यवस्थापन | सांडपाण्याचे व्यवस्थापन |
| ५००० पर्यंत लोकसंख्या | रु.६०/- प्रति व्यक्ति | रु. २८० प्रति व्यक्ति |
| ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या | रु.४५/- प्रति व्यक्ति | रु. ६६० प्रति व्यक्ति |

ब) **गोबरधन प्रकल्प** - प्रति जिल्हा रु.५० लक्ष

क) **मैला गाळ व्यवस्थापन** - प्रति व्यक्ति रु.२३०/- या दराने

ड) **प्लास्टिक कचरा व्यवस्थापन** - प्रति तालुका रु. १६ लक्ष

ई) **वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम** - प्रति ~~शौचालय~~ लाभार्थी रु.१२०००/- अनुदान

इ) **सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम** - प्रति शौचालय रु. ३,००,०००/- (७०% स्वभामि व ३०% १५ वा वित्त आयोग या प्रमाणात)

## ३. घनकचरा व्यवस्थापन-

**व्याख्या** -

घर, सार्वजनिक ठिकाण, व्यवसाय, उद्योग इत्यादीमधून निघणा-या निरुपयोगी टाकावू, सेंद्रिय व असेंद्रिय वस्तूंना "घनकचरा" म्हणतात.

**घनकच-याचे प्रामुख्याने खालील प्रकारात वर्गीकरण केले जाते** -

१. जैविक विघटनक्षम (सेंद्रिय - ओला कचरा) :- उरलेले अन्न, शेतीमधील भाजीपाला, घरातील केर कचरा, शेण, पालापाचोळा, बाजारपेठेतून निघणारा कचरा

२. अजैविक कचरा (असेंद्रिय - सुका कचरा) :- कागद, प्लास्टिक पिशव्या बाटली, वेष्टणे, प्लास्टिक वस्तू, धुळ, माती, दगड विटा इत्यादी

३. धोकादायक कचरा (रुग्नालयीन, रासायनिक) :- मुदतबाह्य औषधे, वापरलेले इंजेक्शन सलाईन्स, औषधांची वेष्ठणे, वापरलेले मासिकपाळी पॅड्स, डायपर्स इत्यादी.

४. धातू व काच (सर्व प्रकारचे धातू, काचेचे सामान इ)

५. इलेक्ट्रानिक कचरा (वायर, खराब बॅटरी, ट्युब लाईट इ)

## ३.१ घनकचरा व्यवस्थापन प्रणाली-

### प्रमुख घटक

१. घरगुती कचराकुंड्या (Household dustbins)

२. सार्वजनिक कचराकुंड्या

३. तीन चाकी सायकल / बॅटरीवर आधारीत सायकल

४. रिसोर्स रिकव्हरी सेंटर / कचरा विलगीकरण केंद्र

५. खतटाकी / नाडेप / गांडूळखत प्रकल्प/ रोटरी ड्रम इत्यादी

६. जैविक कल्चर

७. दुर्गंधी रोधक व निर्जंतूकीकरण फवारणी औषध

८. महिला बचत गटांची नियुक्ती व त्यांना पुरविण्याची सुरक्षिततेची साधने

९. कचरा हाताळण्यासाठी सुरक्षित अवजारे

१०.बचत गटांना द्यावयाचे शुल्क

११.INCINERATOR

१२.कचरा संकलन, विलगीकरण संबंधी अनुषंगीक बाबी.

१. **घरगुती कचराकुंड्या** (Household dustbins) : प्रत्येक घरामध्ये निर्माण होणा-या कच-याचे ओला व सुका कचरा या प्रकारात घरातच वर्गीकरण होणे गरजेचे आहे. केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, वर्गीकृत कचरा घरात गोळा करण्यासाठी प्रत्येक घरामध्ये दोन वेगवेगळ्या रंगाच्या कचराकुंड्या असणे आवश्यक आहे. जेणे करुन, प्रत्येक घरामध्येच कच-याचे वर्गीकरण होवून कचरा गोळा होईल. घरगुती कचराकुंड्यांचे आकारमान साधारण १० लि. इतके असावे. गोळा करण्यात आलेल्या कच-यापैकी जैविक कच-याचे जागच्या जागी व्यवस्थापन करण्यास प्राधान्य देण्यात यावे. यासाठी खालील पध्दतींचा वापर करता येईल.

- पाळीव प्राण्यांसाठी खाद्य

- घरगुती खत खड्डा, पाईल कंपोस्टिग इ.
- वैयक्तिक गांडूळखत / खत टाकी
- ज्या कचऱ्याचे व्यवस्थापन घरगुती स्तरावर करणे शक्य नाही असा सर्व जैविक व अजैविक कचरा पुढील प्रक्रियेसाठी सार्वजनिक ठिकाणी पाठवावा.

२. **सार्वजनिक कचराकुंड्या :** गावातील सार्वजनिक ठिकाण, शासकिय कार्यालये, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, बाजारपेठा तसेच इतर सार्वजनिक जागा इत्यादीमधून निघणा-या कच-याचे साठवण करण्यासाठी सार्वजनिक स्तरावर देखिल कचराकुंड्या असणे गरजेचे आहे. जेणे करुन, सार्वजनिक स्तरावरील कचरा इतरत्र न पसरता कचराकुंड्यामध्ये गोळा होईल. सार्वजनिक कचराकुंड्यांचे आकारमान साधारण ८० लि., १०० लि., १२० लि., १५० लि. ते २०० लि. इतके असावे. सार्वजनिक ठिकाणी संकलन होणारा १०० टक्के कचरा नियमितपणे विलगीकरण केंद्र/RRC कडे पाठविण्यात यावा.

३. **तीन चाकी सायकल / बॅटरीवर आधारीत सायकल :** घरगुती स्तरावर व्यवस्थापन शक्य नसलेला कचरा व सार्वजनिक स्तरावर गोळा करण्यात आलेल कचरा अंतिम प्रक्रियेसाठी विलगीकरण केंद्रापर्यंत (segregation shed/ RRC) घेवून जाणे गरजेचे आहे. कच-याचे वहन करण्यासाठी प्रत्येक गावामध्ये / ग्रामपंचायतींमध्ये तीन चाकी सायकल / बॅटरीवर आधारीत सायकल असणे आवश्यक आहे. सदर वाहनामध्ये वर्गीकृत ओला व सुका कचरा गोळा करण्यासाठी किमान दोन कप्पे असावेत. वाहन चालविण्यासाठी व वर्गीकृत कचरा कप्प्यांमध्ये टाकण्यासाठी असे कमीत कमी एक किंवा दोन व्यक्ति याकरिता ग्रामपंचायतीने उपलब्ध करणे गरजेचे आहे. या कामासाठी महिला बचत गटांना प्राधान्य देण्यात यावे. नसल्यास ग्रामपंचायतींने त्यांचा स्तरावर स्वतंत्र कर्मचारी नेमावे.

४. **रिसोर्स रिकव्हरी सेंटर / कचरा विलगीकरण केंद्र : (रिसोर्स रिकव्हरी सेंटर/विलगीकरण केंद्र (Segregation Shed) स्वरुप)** रिसोर्स रिकव्हरी सेंटर/ विलगीकरण केंद्रामध्ये प्रकारानुसार वर्गीकृत कचरा गोळा करण्यासाठी किमान १० कंपार्टमेंट असावेत (प्लास्टिक, काच, कपडा, धातू, रबर, इलेक्ट्रोनिक, वैद्यकिय कचरा इ.). प्रकारानुसार विलग केलेला कचरा परिसरातील कचरा व्यापा-यांच्यामाध्यमातून विक्रि करावा. या विक्रिनंतरही शिल्लक राहणारा कचरा हा तालुकास्तरावर प्रस्तावित असणा-या प्लास्टिक कचरा व्यवस्थापन केंद्राकडे पाठवावा. सुका

कच-याच्या विक्रितून उपलब्ध होणारा निधी स्थानिक कचरा व्यवस्थापनासाठी वापरावा. यासाठी, रिसोर्स रिकव्हरी सेंटरमध्ये प्रकार निहाय कचरा साठवण करण्याची व्यवस्था असावी. गावपातळीवरील उपकेंद्र, आरोग्य केंद्र, मेडिकल स्टोअर आणि खाजगी दवाखान्यामधून निर्माण होणारा घातक कचरा शक्यतो त्याच ठिकाणी शास्त्रीय पध्दतीने किंवा त्यासाठी संबंधित विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यवस्थेद्वारे त्याचे व्यवस्थापन करावे. याशिवाय, स्थानिक ठिकाणी निर्माण होणा-या घातक कच-याच्या संदर्भात तालुकास्तरावरुन संकलनाची व्यवस्था केली असल्यास त्या व्यवस्थेमार्फत गावातील घातक कच-याचे व्यवस्थापन करावे. अशी व्यवस्था उपलब्ध नसल्यास ती उपलब्ध होण्यासाठी ग्रामपंचायतीने प्रयत्न करावे आणि तोपर्यंत या घातक कच-याचे स्थानिक ठिकाणी शास्त्रीय पध्दतीने व्यवस्थापन करावे.

### अ. रिसोर्स रिकव्हरी सेंटरच्या ठिकाणी आवश्यक सुविधा

रिसोर्स रिकव्हरी सेंटरसाठी संरक्षण व्यवस्था (fencing), छत, कचरा वाहतूक करणा-या वाहनासाठी योग्य मार्गिका व पार्किंग व्यवस्था, पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, मनुष्यबळासाठी स्वच्छता व्यवस्था आणि आवश्यकतेनुसार पर्सनल प्रोटेक्शन साधने (PPE Kit) (handgloves, masks, gumboot, googles, helmet, reflector jacket ) उपलब्ध करुन द्यावीत.

याशिवाय, प्रथमोपचार पेटी, अग्निशामन व्यवस्था, काम करणा-यांना सामान ठेवण्याची आणि कपडे बदलण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

रिकव्हरी सेंटरवर काम करणा-या मनुष्यबळाला त्यांचे काम व्यवस्थित, किमान कष्टात आणि धोके विरहीत करण्यासाठी आवश्यक ती अवजारे (कुदळ, फावडे, घमेले, व्हील कार्ट, लोखंडी पंजा इ.) उपलब्ध असावे.

रिसोर्स रिकव्हरी सेंटरच्या परिसरात वृक्ष लागवड करुन परिसर सुशोभित करण्याचा प्रयत्न करावा. त्यासोबतच रिसोर्स रिकव्हरी सेंटरमध्ये व परिसरात दुर्गंधी पसरणार नाही तसेच परिसर स्वच्छ राहील यासाठी गरजेनुसार निर्जंतुकिकरणासारखे उपाय अंमलात आणावेत.

### आ. रिसोर्स रिकव्हरी सेंटरचे व्यवस्थापन

रिसोर्स रिकव्हरी सेंटरच्या व्यवस्थापनाची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची असेल. या व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायत स्थानिक महिला बचत गटांशी संपर्क करुन ग्रामपंचायत रिसोर्स

रिकव्हरी सेंटरच्या व्यवस्थापनाची जबाबदारी औपचारिक कराराच्या माध्यमातून बचत गटांना देवू शकेल तसे शक्य नसल्यास स्वतंत्र कर्मचारी नेमून रिसोर्स रिकव्हरी सेंटरचे संचालन करु शकेल. रिसोर्स रिकव्हरी सेंटरच्या व्यवस्थापनासाठी येणा-या आवर्ति खर्चाची व्यवस्था रिसोर्स रिकव्हरी सेंटरच्या माध्यमातून उत्पादित होणा-या खताच्या व विक्रि केल्या जाणा-या सुक्या कच-याच्या उत्पन्नातून होणे अपेक्षित आहे. यासाठी शासन नियमानुसार, प्रति कुटूंब व संस्थाकरिता प्रति महिना विशिष्ठ शुल्क ग्रामपंचायतीने निश्चित करुन द्यावे. तसेच, ग्रामपंचायतीला स्वतःचे उत्पन्न देखिल त्यासाठी वापरता येईल. याशिवाय, रिसोर्स रिकव्हरी सेंटरसाठीच्या भांडवली आणि आवर्ति खर्चासाठी ग्रामपंचायतीने प्राधान्याने सन २०२० पासून १५ वा वित्त आयोगा अंतर्गत खर्च करावयाच्या बंधित निधीची शिल्लक रक्कम वापरावी. तद्नंतर निधी कमी पडत असल्यास अबंधित निधीचा वापर करावा. तसेच आवश्यकतेनूसार CSR/ SFC/ MPLAD/ MLALAD निधी त्या त्या निधी अंतर्गत तरतूदीनुसार वापरु शकते. अंतिमतः रिसोर्स रिकव्हरी सेंटर स्वावलंबि आणि स्वयंपुर्ण व्हावे अशा पद्धतीने ग्रामपंचायतीने प्रयत्न करणे अपेक्षित असून कचरा व्यवस्थापनाची ही व्यवस्था शाश्वत स्वरुपात उपलब्ध होण्यासाठी या स्वयंपुर्ण आणि स्वावलंबि व्यवस्था योग्य ठरु शकेल. दैनंदिन कचरा संकलन, वाहतूक, विलगीकरण प्रक्रिया इत्यादी बाबी नियमितपणे होतात किंवा नाही यासाठी नोंदवही ठेवणे व त्यावर ग्रामसेवकाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे.

५. **खतटाकी / नाडेप / गांडूळखत प्रकल्प/ रोटरी ड्रम इत्यादी** : गावस्तरावर एकत्र केलेल्या कच-याचे ओला व सुका असे वर्गीकरण झाल्यावर ओल्या कच-यापासून सेंद्रिय खताची निर्मीती केली जावी आणि हे तयार होणारे खत लिलावाद्वारे किंवा ग्रामसभेत दर निश्चित करुन शेतकऱ्यांना विक्री करुन उपलब्ध होणारा निधी स्थानिक कचरा व्यवस्थापनासाठी वापरावा. याबाबत स्वतंत्र नोंदवही व हिशोब ठेवावा. **यासाठी, रिसोर्स रिकव्हरी सेंटरमध्ये खत टाकी / नाडेप / गांडूळखत प्रकल्प/ रोटरी ड्रम इत्यादी तंत्रज्ञानाचा उपयोग करावा.**

- नाडेपची किंवा अन्य अंतिम व्यवस्थापनाच्या उपांगांची संख्या ठरविताना, गावात निर्माण होणारा कचरा अंदाजे ८० ग्रॅम प्रति व्यक्ति प्रति दिन याप्रमाणे कच-याची परिगणना करावी. त्यानुसार नाडेप प्रकल्पांद्वारे कच-याचे खतामध्ये रुपांतर होण्यासाठी लागणारा कालावधी केंद्र शासनाच्या तज्ञ समितीने शिफारस केलेल्या जैविक कल्चरचा

वापर करुन अंदाजे ४५ दिवस ते ६० दिवसांत विघटन होईल ही बाब विचारात घेऊन प्रकल्पांचे आकारमान व एकूण संख्या निश्चित करावी. अन्यथा नैसर्गिक पध्दतीने ६ ते ८ महिने किंवा गांडूळ खताचा वापर करुन ३ ते ४ महिने कालावधी लागू शकतो. त्यामुळे नाडेपची संख्या वाढविणे आवश्यक राहील. त्यामुळे एकुणच शेडचे आकारमान व नाडेपची वाढलेली संख्या यात सुरवातीला खर्चात मोठया प्रमाणात वाढ होईल. हि बाब विचारात घेऊन ग्रामपंचायतीने आवश्यकतेनूसार तांत्रिक सहाय्य संस्था किंवा पाणी पुरवठा विभागाचे अभियंते यांसोबत चर्चा करुन निर्णय घ्यावा. तथापि, याबाबत वेगवेगळया क्षेत्रफळाचे परिपूर्ण, आकर्षक, डिझाईन निश्चित करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

- प्लास्टिक व तत्संबंधी कचरा प्लास्टिक व्यवस्थापन केंद्रात नियमित पाठवावा व त्याची ही नोंद ग्रामपंचायत स्तरावर ठेवावी.
- धोकादायक कच-याची (मेडीकल वेस्ट) विल्हेवाटबाबत लवकरच स्वतंत्र मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येतील. तोपर्यंत स्थानिक स्तरावर याबाबत निर्णय घेऊन विल्हेवाटबाबत कार्यवाही सुरु ठेवावी.

६. **जैविक कल्चर** : घनकचऱ्याचे कमी कालावधीत सेंद्रिय खतात रुपांतर करण्यासाठी जैविक कल्चरचा वापर करता येईल. याबाबत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या तज्ञ समितीमार्फत शिफारस करण्यात आलेल्या पुरवठादार संस्था निश्चित करण्याची कार्यवाही राज्यस्तरावर सुरु आहे. सदर संस्था निश्चितीनंतर सदर जैविक कल्चर वापरण्याच्या पध्दती, प्रमाण, कालावधी याबाबत सविस्तर सूचना देण्यात येतील.

७. **दुर्गंधी रोधक व निर्जंतूकीकरण फवारणी औषध** : रिसोर्स रिकव्हरी सेंटरच्या परिसरात वृक्ष लागवड करुन परिसर सुशोभित करण्याचा प्रयत्न करावा. त्यासोबतच रिसोर्स रिकव्हरी सेंटरमध्ये व परिसरात दुर्गंधी पसरणार नाही तसेच परिसर स्वच्छ राहील यासाठी गरजेनुसार निर्जंतुकिकरणासारखे उपाय अंमलात आणावेत. त्यासाठी वेळोवेळी औषध खरेदी करणे, फवारणी पंप, फवारणी जागा, फवारणी कालावधी (दैनंदिन/ठराविक दिवसानंतर) याबाबत काटेकोरपणे नियोजन होणे आवश्यक आहे. याबाबतची जबाबदारी निश्चित स्वरुपात ग्रामपंचायत कर्मचारी किंवा महिला बचत गटातील निश्चित केलेली सदस्य यांची राहिल. सदर

औषध फवारणी करताना नागरिकांच्या तसेच फवारणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून त्रास होणार नाही. याची दक्षता घ्यावी. त्यासाठी आवश्यक ती सुरक्षितता बाळगावी.

८. **महिला बचत गटांची नियुक्ती व त्यांना पुरविण्याची सुरक्षिततेची साधने :** घरगुती, सार्वजनिक, संस्थात्मक परिसरातील कचरा गोळा करणे, वहन करणे, प्रक्रिया केंद्रांत नेणे, त्यांचे विलगीकरण करणे, विलगीकरण करुन नाडेप, कंपोस्टींगच्या माध्यमातून खत निर्मिती करणे, तसेच अजैविक कचरा पुढील प्रक्रियेसाठी संबंधित पुरवठादार/प्रक्रिया केंद्राकडे हस्तांतरित करणे याबाबतची सविस्तर सुक्ष्म नियोजन करण्याची जबाबदारी मुख्यतः ग्रामपंचयातची राहिल. तथापि, सदर कामात सुसत्रता आणुन नियमितपणा निश्चित करणे तसेच ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन महिला बचत गटाची नियुक्ती वरील कामासाठी प्राधान्याने करावी. बचत गटाची नियुक्ती करताना ग्रामसभेच्या माध्यमातून इच्छूक बचत गटाची निवड करावी. त्यासाठी आवश्यकतेनुसार जिल्हा ग्रामविकास यंत्रणा जिल्हा परिषद यांच्याकडील MSRLM कक्षाचे सहाय्य घ्यावे.

रिसोर्स रिकव्हरी सेंटरमध्ये काम करणा-या मनुष्यबळासाठी आगमी काळात उपलब्ध होणा-या प्रशिक्षणाच्या संधी योग्य पद्धतीने वापरुन मनुष्यबळाचे कौशल्य वाढवावे.मनुष्यबळासाठी स्वच्छता व्यवस्था आणि आवश्यकतेनुसार पर्सनल प्रोटेक्शन साधने (PPE Kit) (handgloves, masks, gumboot, googles, helmet, reflector jacket ) उपलब्ध करुन द्यावीत.

याशिवाय, प्रथमोपचार पेटी, अग्निशामन व्यवस्था, काम करणा-यांना सामान ठेवण्याची आणि कपडे बदलण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

९. **कचरा हाताळण्यासाठी सुरक्षित अवजारे :** रिकव्हरी सेंटरवर काम करणा-या मनुष्यबळाला त्यांचे काम व्यवस्थित, किमान कष्टात आणि धोके विरहीत करण्यासाठी आवश्यक ती अवजारे (कुदळ, फावडे, घमेले, व्हील कार्ट, लोखंडी पंजा इ.) उपलब्ध असावे. **(वरील मुद्दा क्र. ६, ७, ८ व ९ मध्ये उल्लेख केलेले जैविक कल्चर, औषधे, संरक्षणाचे साधने, सुरक्षित अवजारे, आदींची खरेदी मात्र सर्वात शेवटी करावी. त्या आधी घरगुती/सार्वजनिक कचराकुंडया, वाहन, विलगीकरण केंद्र, महिला बचत गटाची नियुक्ती इ. बाबीं पूर्ण कराव्यात.)**

१०.**बचत गटांना द्यावयाचे शुल्क :** कचरा संकलनाची कार्यवाही सुरु झाल्यानंतर सुरुवातीच्या दोन ते तीन महिनेसाठी लागणारा खर्च ग्रामपंचायतीने स्वत: करावा. तद्नंतर बचत गटांचा नियमितपण व नागरिकांचा प्रतिसाद लक्षात घेऊन विशिष्ट शुल्क आकरण्याची कार्यवाही ग्रामपंचायतकडून करता येईल. ग्रामपंचायतच्या ग्रामसभेच्या माध्यमातून प्रति कुटुंब प्रति माहे शासन नियमांच्या अधिन राहून शुल्क निश्चित करावे. सदर निश्चित केलेले शुल्कबाबत प्रत्येक कुटुंबांला अवगत करावे. तसेच दर माहे मासिक शुल्क नियमितपणे वसुल होऊन बचत गटाला मिळणेबाबत नियोजन करावे.

११. INCINERATOR: मासिक पाळी दरम्यान सॅनीटरी पॅड मोठ्याप्रमाणावर वापरली जातात. सॅनीटरी पॅड वापरल्यानंतर सध्यस्थितीत त्याचे सुयोग्य आणि शास्त्रीय व्यवस्थापन करण्यासंदर्भात आवश्यक त्या सुविधा सर्वत्र उपलब्ध नाहीत. परिणामी, सॅनीटरी पॅड वापरानंतर सामान्य कचऱ्यात, शौचालयाच्या भांड्यात किंवा उघड्यावर टाकली जातात. या अशास्त्रीय व्यवस्थापनामुळे शौचालय चोक होणे, उघड्यावर टाकलेले सॅनीटरी पॅड जलस्त्रोतांच्या परिसरात असतील तर जलस्त्रोत दुषित होणे, वापरलेले सॅनीटरी पॅड जनावरांच्या पोटात जाणे असे धोकादायक परिणाम संभवतात. या पार्श्वभूमीवर, गाव पातळीवर सर्वांना सहज वापरता येईल अशा ठिकाणी इनसेरीनेटर उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

१२.**कचरा संकलन, विलगीकरण संबंधी अनुषंगीक बाबी:** या संदर्भात स्थानिक परिस्थितीनुसार वेळोवेळी करावयाच्या गरजा लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने नियोजन करावे.

## ४. कचरा वर्गीकरण व अंतिम व्यवस्थापन –

कुटूंब व सार्वजनिक स्तरावर निर्माण होणारा कचरा गोळा करणे, त्याचे वर्गीकरण करणे व अंतिम व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी, गावामध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार एकत्रित किंवा स्वतंत्ररित्या कचरा साठवण व्यवस्था/ वर्गीकरण व्यवस्था/ अंतिम प्रक्रिया व्यवस्थ्या उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. हे काम एकाच किंवा वेगवेगळ्या शेडमध्ये करता येईल तथापि, यामध्ये जास्त अंतर नसावे. तसेच, या सर्व व्यवस्था एकाच छताखाली उपलब्ध होणे वाहतूक, मनुष्यबळ व अनुषंगिक व्यवस्थांच्या दृष्टीने योग्य होईल. म्हणजे गावपातळीवर रिसोर्स रिकव्हरी सेंटर / विलगीकरण केंद्र (segregation shed) च्या स्वरुपात ही व्यवस्था काम करेल.

## ५. सामाजिक सहभाग आणि क्षमता बांधणी-

- रिसोर्स रिकव्हरी सेंटर शाश्वत आणि अपेक्षित स्वरुपात कार्यरत राहण्यासाठी स्थानिक नागरिकांचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे. कचरा निर्माण होणा-या ठिकाणी त्याची साठवण व विलगीकरण इथपासून ते रिसोर्स रिकव्हरी सेंटरमध्ये निर्माण होणा-या सेद्रिय खताच्या खरेदी पर्यंत स्थानिक नागरिकांचे योगदान महत्वाचे असणार आहे. त्या दृष्टीने, रिसोर्स रिकव्हरी सेंटर संदर्भात ही व्यवस्था समजावून सांगण्याठी, नागरिकांच्या भूमिका स्पष्ट करण्यासाठी आणि गावाला कचरामुक्त गावाचा दर्जा मिळवून देण्यात त्यांचे अपेक्षित योगदान समजावून देण्यासाठी गावपातळीवर विविध सवांद उपक्रमाची अंमलबजावणी करुन स्थानिकांचा सहभाग निश्चित करावा. तसेच रिसोर्स रिकव्हरी सेंटरमध्ये काम करणा-या मनुष्यबळासाठी आगमी काळात उपलब्ध होणा-या प्रशिक्षणाच्या संधी योग्य पद्धतीने वापरुन मनुष्यबळाचे कौशल्य वाढवावे.

## ६. ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणे (GPDP)

- सन २०२३-२४ चे ग्रामविकास आराखडे (GPDP) बनवताना घनकचरा व्यवस्थापन प्रणालीसाठी आवश्यक वर ११ उल्लेख केलेल्या बाबींचा प्राधान्याने सामावेश करणे आवश्यक आहे.
- स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-२, ग्राम विकास विभाग व केंद्र शासनाच्या दि.१७/०३/२०२० रोजीच्या (Advisory) पत्रातील यांनी दिलेल्या निर्देशानुसार, ग्रामपंचायतीने १५ वा वित्त आयोगा अंतर्गत उपलब्ध होणा-या निधीपैकी ३०% बंधित निधी स्वच्छता विषयक बाबींवर खर्च करावयाचा आहे. यासाठी, ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) तयार करताना ग्राम विकास विभागाकडील दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये व दिनांक ८ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.
- **जर ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) तयार करताना स्वच्छते विषयक बाबींसाठी ३०% बंधित निधीचा आराखड्यामध्ये समावेश केला नसेल तर, तसे आराखडे ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दि.८/०६/२०२३ नूसार सुधारीत करुन त्यास मा. मुख्य कार्यकारी अधिका-यांची मान्यता घ्यावी.**
- केंद्र शासनाच्या दि.१७/०३/२०२० रोजीच्या पत्रानूसार ज्या ग्रामपंचायतीमध्ये पाणी पुरवठ्यासाठी १५ वा वित्त आयोगाच्या ३०% बंधित निधीची आवश्यकता नसेल अशा संपूर्ण


ठिकाणी एकूण ६०% बंधित निधी स्वच्छता विषयक कामांसाठी वापरता येईल. सद्यस्थितीत जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठयाची जवळ-जवळ सर्व कामे समाविष्ठ झाल्यामुळे याबाबत ग्रामपंचायत निहाय खात्री करुन सन २०२३-२४ च्या ग्रामपंचायत विकास आराखडयात जास्तीत जास्त ६०% बंधित निधी स्वच्छता विषयक कामांसाठी आरक्षित करावा.

- स्वच्छता विषयक बाबींचा, ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) तयार करताना, स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत घ्यावयाच्या उपांगांचा प्राधान्याने समावेश करावा. यासंदर्भात, केंद्र शासनाच्या जलशक्ती आणि पंचायत राज मंत्रालय या दोन मंत्रालयानी संयुक्तरित्या दिनांक १७ मार्च, २०२० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये स्वच्छतेसंदर्भात कोण कोणती कामे घेता येतील यासंबंधि ११ कामांची सूची दिलेली आहे. त्यानुसार, यापुर्वी स्वच्छतेचा ३०% बंधित निधी अनुज्ञेय ११ कामां व्यतिरिक्त इतर घटकांसाठी वापरला गेला असल्यास यापुढे प्राप्त होणारा १५ वा वित्त आयोगाच्या अबंधित निधीतून हा स्वच्छता विषयक बाबीं व्यतिरिक्त इतर घटकांवर वापरलेला निधी स्वच्छता विषयक बाबींसाठी वापरावा. सन २०२०-२१, सन २०२१-२२, सन २०२२-२३ या वर्षातील प्राप्त बंधित निधीच्या ३०% वापरावयाचा बंधित निधी किती होता याची पडताळणी करुन जर तो त्या प्रमाणात नसेल तर तेवढ्या निधीची १००% तरतूद सन २०२३-२४ च्या ग्रामपंचायत विकास आराखड्यामध्ये (GPDP) करण्यात यावी. मात्र, कोणत्याही परिस्थितीत अभियान कालावधीत (सन २०२०-२५) मध्ये १५ वा वित्त आयोगाकडून एकूण प्राप्त निधीच्या ३०% पेक्षा कमी खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- ग्रामपंचायतींने स्वच्छता विषयक बाबींचा ग्रामपंचायत विकास आराखड्यामध्ये समावेश करणे, बंधित निधीचा ३०% निधी स्वच्छतेच्या उक्त ११ बाबींवर खर्च करणे इत्यादी शासनाच्या निर्देशांचे उल्लंघन केल्यास, त्याबाबत जबाबदारी निश्चित करुन ग्रामविकास विभागाकडील शा.नि दि.०८.०६.२०२३ मधील (III) नुसार संबंधितांवर कारवाईची शिफारस ग्राम विकास विभागाकडे करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
- केंद्र शासनाच्या दिनांक १७ मार्च, २०२० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील स्वच्छता विषयक कामे खालीलप्रमाणे :-


९५

१. स्वच्छता आणि घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनासाठी निर्माण केलेल्या स्वच्छता सुविधांची देखभाल व दुरुस्ती उदा. सामुदायिक स्वच्छता संकुल, सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली, गोबरधन प्रकल्प, मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्प, शोष खड्डे, कंपोस्ट खड्डे.
२. कुटूंबस्तरावरुन स्थानिक कचरा प्रक्रिया केंद्रा पर्यंत कच-याचे संकलन व वहन आणि प्रक्रिया केंद्राचे व्यवस्थापन
३. सार्वजनिक स्वच्छता संकुलाचे बांधकाम (स्वभामि टप्पा २ च्या आर्थिक तरतूदीनुसार)
४. सार्वजनिक कंपोस्ट पिट, सार्वजनिक शोषखड्डे, सांडपाणी व्यवस्थापन प्रणाली बांधकाम (स्वभामि टप्पा २ च्या आर्थिक तरतूदीनुसार)
५. गावपातळीवरील संकलित प्लास्टिक कच-याची तालुकास्तरीय प्लास्टिक व्यवस्थापन प्रकल्प केंद्रापर्यंत वाहतूक (स्वभामि टप्पा २ मार्गदर्शक सूचनेनुसार)
६. सार्वजनिक स्वच्छता संकुलांची रेट्रोफिटींग
७. नाल्यांचे बांधकाम
८. गावातील कचरा व्यवस्थापन परिसरात स्वच्छते संबंधि काम करणा-या कर्मचा-यांसाठी mask, gumboot इत्यादी सुरक्षा साधनांची उपलब्धता करुन देणे
९. सार्वजनिक ठिकाणी कचरा वर्गीकरणासाठी कचराकुंड्यांची उपलब्धता करुन देणे (दोन कचराकुंड्या)
१०. मासिकपाळीमध्ये वापरलेल्या शोषकांच्या व्यवस्थापनासाठी सोयीच्या ठिकाणी आणि शक्यतो संकलनाच्या ठिकाणी INCINERATOR (approved by CPCB / SPCB) ची उपलब्धता
११. Nationa Biogas and Organic Manure Program (NMBOMP) Ministry of New and Renewable Energy यांच्या मार्गदर्शक सूचनानुसार गोबरधन प्रकल्प विस्तार करण्यासाठी (प्रति तालुका किमान १०)

**घनकचरा व्यवस्थापनाबाबत वरीलप्रमाणे सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन महाराष्ट्र राज्य स्वच्छतेच्या बाबतीत आदर्श राज्य बनवू या... !!**



घनकच-याचे वर्गीकरण
जैविक विघटनक्षम (सेंद्रिय - ओला कचरा)- उरलेले अन्न, शेतीमधील भाजीपाला, घरातील केर कचरा, शेण, पालापाचोळा, बाजारपेठेतून निघणारा
अजैविक कचरा (असेंद्रिय - सुका कचरा)
धोकादायक कचरा (रुग्णालयीन, रासायनिक)
धातू व काच
इलेक्ट्रानिक कचरा

घनकचरा व्यवस्थापन प्रणाली
कुटुंबस्तर कचरा
सार्वजनिक स्तरावरील कचरा
व्यवस्थापन प्रणाली वैशिष्ट्ये
निधी अनुज्ञेयता
वर्गीकरण व प्रत्येकी दोन भिन्न कचराकुंड्यामध्ये कचरा गोळा करणे
कचरा वहन व्यवस्था
कच-याचे वर्गीकरण (सार्वजनिक) व अंतिम व्यवस्थापन
महिला बचत गटांचा सहभाग, क्षमता बांधणी, संवाद उपक्रम आणि सामाजिक सनियंत्रण
५००० पर्यंत लोकसंख्या- रु.६०/- प्रति व्यक्ति
५००० पर्यंत लोकसंख्या- रु.४५/- प्रति व्यक्ति
जागच्या जागी व्यवस्थापन
तीन चाकी सायकल (किमान दोन कप्पे)
पाळीव प्राण्यासाठी खाद्य
घरगुती खत खड्डा, वैयक्तिक नाडेप
महत्वाचे - १५ वा वित्त आयोगातील स्वच्छतेसाठीचा बंधित असणारा ३०% निधी आणि पाण्यासंबंधी बंधित असणा-या ३०% निधिपैकी शिल्लक असा दोन प्रकरचा बंधित निधी ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) तयार करताना विचारात
प्रकार निहाय कचरा साठवण (ओला व सुका)
सुविधा आणि व्यवस्था